# सीएसएमटी ते मुंबई सेंट्रल भुयारीकरण पूर्ण

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेतील सीएसएमटी ते मुंबई सेंट्रलपर्यंत भुयारीकरण गुरुवारी पूर्ण झाले. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत (एमएमआरसी) हे काम करण्यात आले असून, एकाच टप्प्यात सलग चार किमी अंतराचे पहिलेच भुयारीकरण आहे. एमएमआरसीने हा मार्गिकेतील २८वा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे.

\- पान ३

एकाच टप्प्यात सलग चार किमी अंतराचे पहिलेच भुयारीकरण : २८वा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण; वैतरणा टनेल ठरले पहिले मशीन

# मेट्रो-३ : सीएसएमटी ते मुंबई सेंट्रल भुयारीकरण पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेतील सीएसएमटी ते मुंबई सेंट्रलपर्यंत भुयारीकरण गुरुवारी पूर्ण झाले. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत (एमएमआरसी) हे काम करण्यात आले असून, एकाच टप्प्यात सलग चार किमी अंतराचे पहिलेच भुयारीकरण आहे. एमएमआरसीने हा मार्गिकेतील २८वा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. एकाच टप्प्यात सलग ४ किमी अंतराचे भुयारीकरण करणारे वैतरणा-२ हे मेट्रो-३ चे पहिले टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) ठरले.

मेट्रो-३ मार्गिकेतील पॅकेज-२च्या वैतरणा २ या टीबीएमद्वारे भुयारीकरणास फेब्रुवारी २०१८मध्ये सीएसएमटी लॉंचिंग शाफ्ट येथून सुरुवात झाली होती. एकूण २७३० कॉंक्रिट रिंगसचा वापर करत मेट्रो-३ मार्गिकेवरील मुंबई सेंट्रलपर्यंतच्या सर्वांत जास्त अंतराचा पल्ला वैतरणा-२ टीबीएमने गाठला. यावर प्रतिक्रिया देताना मेट्रो-३ एमएमआरसीचे व्यवस्थापकीय संचालक रणजीतसिंह देओल म्हणाले, पॅकेज २ अंतर्गत येणारा भाग हा समुद्रकिनाऱ्याला समांतर होता. तसेच या मार्गावर अनेक जीर्ण आणि जुन्या इमारतींचा समावेश आहे. या भागात भूगर्भातील पाण्याची पातळी १-४ मीटर इतक्या जवळ अंतरावर होती, त्यामुळे मार्गिकेतील भुयारीकरणाचा हा टप्पा सर्वांत आव्हानात्मक होता.

कोविड-१९च्या साथीमुळे हे काम अधिक आव्हानात्मक झाले होते. मात्र राज्य शासनाच्या सर्व मार्गदर्शन सूचनांचे पालन करून हे काम पूर्ण केले, असेही देओल म्हणाले. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गिकेवरील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मुंबई सेंट्रल दरम्यान ४ किमी भुयारीकरणाअंतर्गत सीएसएमटी, काळबादेवी, गिरगाव, ग्रांट रोड आणि मुंबई सेंट्रल या पाच भूमिगत स्थानकांचा समावेश आहे.



मेट्रो-३ मार्गिकेतील पॅकेज-२च्या वैतरणा २ या टीबीएमद्वारे भुयारीकरणास फेब्रुवारी २०१८मध्ये सीएसएमटी लॉंचिंग शाफ्ट येथून सुरुवात झाली होती.

### समुद्रकिनाऱ्यामुळे आव्हान

◆ पॅकेज २ अंतर्गत येणारा भाग हा समुद्रकिनाऱ्याला समांतर होता. तसेच या मार्गावर अनेक जीर्ण आणि जुन्या इमारतींचा समावेश आहे. या भागात भूगर्भातील पाण्याची पातळी १-४ मीटर इतक्या जवळ अंतरावर होती, त्यामुळे हा टप्पा सर्वात आव्हानात्मक होता.

# मेट्रो २ बी मार्गिकेच्या कामाला गती

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** लॉकडाउनदरम्यान मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (एमएमआरडीए) विविध प्रकल्पांची कामे सुरु करण्यात आली आहेत. यामध्ये डी.एन. नगर ते मंडाले दरम्यानच्या मेट्रो-२ बी मार्गिकेच्या कामालाही सुरुवात केली असून या कामाला गती आली आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने केंद्र सरकारने देशभरामध्ये लॉकडाउन घोषित करण्यात आला. या वेळी एमएमआरडीएच्या सुरु असलेल्या प्रकल्पांच्या कामाला अंशत: स्थगिती देण्यात आली होती. मात्र ज्या ठिकाणी कोरोनाचा प्रभाव नसेल अशा भागांत काम करण्यास नंतर परवानगी देण्यात आली. यानंतर एमएमआरडीए प्राधिकरणाने सोशल डिस्टन्सिंगचे सर्व नियम पाळत प्रकल्पांची कामे सुरु केली. या वेळी डी.एन. नगर ते मंडालेदरम्यानच्या मेट्रो-२ बी मार्गिकेवर गर्डरच्या कामालाही सुरुवात करण्यात आली आहे. डी.एन. नगर ते मंडालेदरम्यान २३.६३ किमी उन्नत मार्गिका तयार होणार आहे. या संपूर्ण मार्गिकेदरम्यान एकूण २२ स्थानके असणार आहेत. जेव्हा लॉकडाउन सुरु झाले त्याचवेळी एमएमआरडीएने ११ हजार मजुरांच्या राहण्याची आणि खाण्याची सोय केली होती. त्यामुळे त्यांच्या स्थलांतरापासून त्यांना रोखण्यात यश आले होते. आता या मजुरांच्या साहाय्याने एमएमआरडीएने पुन्हा कामे सुरु केली असून, मान्सूनपूर्व कामांनाही सुरुवात केली आहे.

### १०,९८६ कोटींचा खर्च

मेट्रो-२ बी या संपूर्ण उन्नत मार्गिकेसाठी १०,९८६ कोटींचा खर्च करण्यात येणार आहे. या मार्गिकेमध्ये इंटरचेंजची सुविधा उपलब्ध होणार आहे. ही मार्गिका डी.एन. नगरमध्ये घाटकोपर ते वर्सोवा या मेट्रो-१ मार्गिकेला जोडली जाणार आहे. तर बीकेसीमध्ये कुलाबा ते सीप्झदरम्यान होणाऱ्या मेट्रो-३ मार्गिकेला छेदणार आहे. तर चेंबूरमध्ये मोनोरेलला आणि पूर्व द्रुतगती महामार्गावर मेट्रो-४ मार्गिकेला जोडली जाणार आहे.